वाचाः- १. शासन निर्णय ,अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक-साखर २०१४/प्र.क्र.७७/ना.पु.१९ दिनांक १९ जुन २०१४

२. मा.उपसचिव अन्न, नागरी पुरवठा यांचे अ.शा.पत्र.क्र.साखर-२०१४/प्र.क्र.७७/ना.पु.१९ दि. ०५ जुलै २०१४

३. मा. कार्यासन अधिकारी ,अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे अ.शा.पत्र.क्र.साखर- १११७ /प्र.क्र.७६/ना.पु.१९ दिनांक २१ जुन २०१७

४. धनराज ॲण्ड को. यांचा करारनामा दिनांक. २६.०५.२०१७

जा.क्र.२०१७/पुरवठा/प्रशा-५/नि.सा./कावी- १७३

जिल्हाधिकारी कार्यालय (पुरवठा) जालना

दिनांकः- २३.०६.२०१७

<u>आदेशः-</u>

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत जालना जिल्हयासाठी माहे जुलै २०१७ करीता साखर प्रति किलो रु.२०.०० या दराने, अंत्योदय योजनेतील लाभार्थ्यांना प्रति कार्ड १ किलो ग्रॅम प्रमाणे वितरण करावयाचे आहे.

माहे जुलै २०१७ च्या नियतनाची उचल वीस दिवसाच्या आत करावयाचे निर्देश असुन पहील्या दहा दिवसात ४०% साखरेचा पुरवठा उर्वरीत दहा दिवसात ६०% पुरवठा करण्याबाबत कळविले आहे. पुरवठादारांनी साखर एस-३० दर्जाची रिफाइन पांढरी शुभ्र चांगल्या प्रतीची ५० किलोच्या पॉली पॉलिप्रॉपिलीन (P.P.) बॅगमध्ये साखर पुरविण्याबाबत कळविले असुन बॅगाचे निव्वळ वजन १६० ग्रॅम असले पाहिजे.

**तालुकानिहाय नियतन :- प्रति कार्ड १ किलो प्रमाणे .**

| अ.क्र. | तालुक्यांचे नांव | शासकीय गोदामांचे नांव | अंत्योदय कार्डसंख्या | मंजुर नियतन (क्विं मध्ये) | देण्यात येणारे नियतन (क्विंटल) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | जालना | शासकीय गोदाम अंबड रोड जालना | ९५११ | ९५.११ | ०० | शासकीय धान्य गोदाम जालना,बदनापुर,परतूर,मंठा, घनसावंगी येथे साखर शिल्लक असल्यामुळे त्यांना साखर नियतन देण्यात येत नाही. त्यांनी स्तंभ ५ मध्ये नमूद केल्यानूसार शिल्लक साठयातून नियतन वितरीत करावे. |
| २ | बदनापुर | शासकीय गोदाम टि.एफ.जालना | ३८०१ | ३८.०१ | ०० | |
| ३ | भोकरदन | शासकीय गोदाम भोकरदन | ७३९४ | ७३.९४ | ७३.९४ | |
| ४ | जाफ्राबाद | शासकीय गोदाम जाफ्राबाद | ४०२६ | ४०.२६ | ४०.२६ | |
| ५ | परतुर | शासकीय गोदाम परतुर | ३९६८ | ३९.६८ | ०० | |
| ६ | मंठा | शासकीय गोदाम मंठा | ४१२२ | ४१.२२ | ०० | |
| ७ | अंबड | शासकीय गोदाम अंबड | ५९४७ | ५९.४७ | ५५.५१ | |
| ८ | घनसावंगी | शासकीय गोदाम घनसावंगी | ५२०२ | ५२.०२ | ०० | |
| एकुण | | | ४३९७१ | ४३९.७१ | १६९.७१ | |

PUT UP

तहसीलदार यानी साखरेचे नियतन हे शासन पत्र क्र.११९०/१८५५/४४६६, दिनांक १५ जुन १९९० अन्वये वाटप करावे. साखर पुरवठादार हे विहीत मुदतीमध्ये साखर उचल करतील याबाबत तहसीलदार यांनी विशेष काळजी घ्यावी. तसेच साखर पुरवठादार यांनी विहीत मुदतीमध्ये साखर पुरविली नाही तर त्याचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

जिल्हा पुरवठा अधिकारी
जालना

**प्रतिलिपीः-**

१. मा. आवर सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहंक संरक्षण विभाग, नापु १९, मंत्रालय विस्तार मुंबई- ३२
२. मा. उपसंचालक अन्न,नागरी पुरवठा आयुक्ताचे कार्यालय फ्रि प्रेस जनरल मार्ग ५ मुंबई- २१
३. मा. वित्तीय सल्लागार व उपसचिव अन्न, नागरी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन जी.टी. हॉस्पिटल कॉम्पलेक्स इमारत, ८ वा मजला लोकमान्य टिळक मार्ग मुंबई- ४००००१
४. मा. उपआयुक्त (पुरवठा) औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
५. उपविभागीय अधिकारी जालना, भोकरदन, परतुर, अंबड यांना माहितीस्तव देण्यात येते.
६. धनराज ॲण्ड को. (साखर पुरवठादार) यांना देवून कळविण्यात येते की, शासन पत्र दिनांक १९.०४.२०१४ मधील सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक असुन जिल्हयासाठी देण्यात आलेली १६९.७१ क्विंटल साखर ३८३९/- प्रतीक्विंटल या दराने साखर एस-३० दर्जाची रिफाइन पांढरी शुभ्र चांगल्या प्रतीची ५० किलोच्या पॉली पॉलिप्रॉपिलीन (P.P.) बॅगमध्ये खरेदी करुन तालुक्यातील शासकीय धान्य गोदाम भोकरदन येथे ७३.९४ क्विंटल व शासकीय धान्य गोदाम जाफ्राबाद येथे ४०.२६ क्विंटल व शासकीय धान्य गोदाम अंबड येथे ५५.५१ क्विंटल साखर पुरवावी बॅगाचे निव्वळ वजन १६० ग्रॅम असले पाहिजे.
७. सर्व तहसीलदार/गोदामपाल जालना, बदनापुर, भोकरदन, जाफ्राबाद, परतुर, मंठा, अंबड, घनसावंगी यांना देवुन कळविण्यात येते की, साखर पुरवठादार यांचेकडुन साखर एस-३० दर्जाची रिफाइन पांढरी शुभ्र चांगल्या प्रतीची असल्याबाबत प्रयोग शाळेचा अहवाल घेवुनच साखर शासकीय गोदामामध्ये साठवून घ्यावी.

जिल्हा पुरवठा अधिकारी
जालना

PUT UP